डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
कृषि नगर, अकोला – ४४४१०४ (महाराष्ट्र).

वाचा -महाराष्ट्र कृषि विद्यापीठ सेवाप्रवेश मंडळ पुणे यांचे जाहिरात क्र. मकृसेंम/मकृप/जाहि-२७(अ) / विप्र – प्रा/२२४/२०१८ दिनांक १३ डिसेंबर, २०१८

## सुचना

सर्व संबधित विद्याविषयक अधिकारी /कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ, पुणे यांनी कृषि विद्यापीठातील विभाग प्रमुख व प्राध्यापक या संवर्गातील सरळसेवेने एकाकी रिक्त पदांची संदर्भकिंत जाहिरात प्रसिध्द केली आहे. सदरहु जाहिरात तसेच पदांकरीता आवश्यक असणारी शैक्षणीक अर्हता, अनुभव मुल्यांकन व अर्जादाराकरीता सुचना ई. माहिती विद्यापीठाचे तसेच महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवाप्रवेश मंडळ, पुणे येथे विहीत मार्गाने अर्ज सादर करावयाची अंतिम **दिनांक १५ जानेवारी, २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत** असल्यामुळे सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्हताप्राप्त ईच्छुक उमेदवारांनी जाहिरतीमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे विहीत मार्गाने त्यांचे अर्ज या कार्यालयास कुठल्याही परिस्थीत **दिनांक १३/०१/२०१९** पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. अर्ज सादर करतेवेळी उमेदवाराने अर्जासोबत त्यांचे अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये कार्यालय प्रमुख व नियंत्रण अधिकारी यांचे स्वाक्षरीने तीन प्रतिमध्ये कुलसचिवांच्या प्रतिस्वाक्षरीकरीता सादर करणे आवश्यक राहील एक प्रत अर्जासोबत जोडावी तसेच दोन प्रती सुटया सादर कराव्यात पैकी एक प्रत कुलसचिवांचे प्रतिस्वाक्षरी नंतर अर्जदारास परत करण्यात येईल.

अश्या रितीने प्राप्त अर्ज दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी विशेष दुतामार्फत महाराष्ट्र कृषि विद्यापीठ सेवा प्रवेश मंडळ, पुणे यांना पाठविण्यात येतील.

कार्यालयप्रमुख व नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या कर्मचाऱ्यांचे अनुभव प्रमाणपत्रातील माहिती त्यांचे मुळसेवापुस्तकावरून काटेकोरपणे तपासुन सादर करावे. तसेच कॅस अंतर्गत प्राध्यापक पदाचा अनुभव अर्हताकारी अनुभव म्हणून ग्राहय धरता येणार नाही, असे सेवा प्रवेश मंडळाच्या जाहिरातीमध्ये अट क्र ८ मध्ये नमूद केले आहे. त्यांची संबधितांनी नोंद घ्यावी.

**उमेदवारांनी अर्ज सादर करतांना पुढील सुचनांचे पालन करावे.**

१. सादर करावयाचे अर्जास संपुर्ण पृष्ठ क्रमांक देण्यात यावे.
२. आवश्यक असेल तेथे पताका लावण्यात याव्यात.
३. अनुक्रमणीकेसह यादी सादर करावी
४. उमेवाराचे अनुभव प्रमाणपत्र हे या सुचनापत्रकासोबत सादर केलेल्या नमुन्यामध्येच सादर करावे.
५. डिमांड ड्राफ्टचे मागील बाजुस अर्जदाराचे नाव व अर्ज सादर केलेल्या पदांचे नांव नमुद करावे.
६. RTGS/NEFT/Fund Tranfer केले असल्यास त्याबाबतची रितसर बँकेची पावती जोडणे अनिवार्य
७. अर्जामधिल पाने सुटी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

स्वा/-
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपी माहिती करीता –

१. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांना माहिती करीता.
२. अध्यक्ष महाराष्ट्र कृषि सेवाप्रवेश मंडळ पुणे यांना माहिती करीता

प्रतिलिपी माहिती व उचित कार्यवाहीकरीता –

१. सर्व कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला

---

सर्व कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त जाहिरात त्यांचे अधिनस्थ कार्यरत असलेल्या विद्याविषयक कर्मचारी /अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता डॉ. पंदेकृवि., अकोला
३. विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा सुचित करण्यात येते की, उपरोक्त जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर प्रदर्शित करावी.
४. मा. कुलगुरूंचे स्विय सहायक डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला.

कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला